Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-II FEB. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

शिक्षकाच्या उत्तरदायित्त्वाचे मूल्यमापन : एक अभ्यास

डॉ.जाधव पद्मा मोहनराव
सहयोगी प्राध्यापिका,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
परभणी.

सारांश

"Teachers are the pillar stones of the nation" असे शिक्षकांच्या संदर्भात म्हटले जाते ते योग्यच आहे. कारण राष्ट्रउभारणीच्या कार्यामध्ये शिक्षकाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक हा खऱ्या अर्थाने देशसेवक आहे राष्ट्र विकासासाठी राष्ट्रनिर्मितीसाठी अनेक पिढयांवर सुसंस्कार करून शिक्षक एका अर्थाने राष्ट्राची सेवाच करत असतो. शिक्षकाच्या अंगी असलेले सद्गुण, त्याचे सद्वर्तन हेच प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या राष्ट्राच्या जडणघडणीसाठी प्रेरणादायी असते. शिक्षकामध्ये उत्तरदायित्वाची भावना असतेच. कारण या भावनेतूनच शिक्षक विधायक कार्ये करत असतात. मात्र त्यासाठी शिक्षकाला आपल्या शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय कार्यासाठी योग्य वेळ मिळणे आवश्यक असते. आज शिक्षकांचे मागे अनेक अशैक्षणिक प्रशासकीय कामे लागली आहेत. त्यामुळे शिक्षकांना आपल्या कार्यासाठी पुरेसा वेळ देता येत नाही. शिक्षकाच्या माध्यमातून अशी महान कार्ये व्हावीत यासाठी शिक्षकामध्ये आपला व्यवसाय, आपले विद्यार्थी, आपले राष्ट्र यांप्रती उत्तरदायी असणे तर आवश्यकच आहे. त्याशिवाय त्याने नैतिक दृष्ट्या देखील उत्तरदायित्व असणे अत्यंत आवश्यक असते.

Keywords : शिक्षक, उत्तरदायित्त्व, शिक्षकाचे उत्तरदायित्त्व, उत्तरदायित्त्वाची क्षेत्रे.

प्रास्ताविक

"आपल्या राष्ट्राचे भवितव्य वर्गावर्गामधून घडत आहे" असे कोठारी आयोगाने आपल्या अहवालात नमूद केले आहे. याचा अर्थ राष्ट्राचे भवितव्य हे शिक्षणाद्वारे आकारास येते. म्हणजेच राष्ट्रनिर्माणाची, राष्ट्राच्या जडणघडणीची आणि आपले राष्ट्र टिकविण्याची जबाबदारी विश्वासाने भावी पिढयांवर सोपविण्यासाठी आवश्यक असलेले सामर्थ्य त्यांच्यामध्ये शिक्षणाद्वारेच निर्माण करता येऊ शकते आणि हे महान कार्य करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. म्हणून शिक्षण प्रक्रियेतील एक जबाबदार घटक म्हणून शिक्षकाकडे पाहिले जाते.

शिक्षक हा राष्ट्राच्या मुख्यस्थानी आहे. समाजाची सेवा शिक्षक, रक्षक, पोषक आणि सेवक अशा चार अंगानी होत असते. त्यातील प्रत्येक दृष्टीकोनातून समाजाची सेवा करण्याचे प्रचंड सामर्थ्य शिक्षकात आहे. कारण शिक्षक ही वृत्ती आहे वृत्ती म्हणजे स्वभाव होय. हा स्वभाव आचार, विचार, उच्चार, विहार या चतु:सूत्रीमधून प्रकट होत असतो. या चतु:सूत्रीमध्ये समन्वय साधणारा शिक्षकच 'आचार्य' पदास पात्र होतो.

संशोधनाची गरज

आचार्यापासून शिक्षक व शिक्षणसेवक या पदापर्यंत शिक्षकाच्या दर्जा आणि भूमिकेमध्ये बदल होत चालला आहे शिक्षणक्षेत्रात सतत होत असलेले धोरणात्मक बदल, शिक्षकांना अध्ययन–अध्यापनाव्यतिरिक्त करावी लागणारी इतर कामे, सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, तंत्रवैज्ञानिक बदल यामुळे शिक्षकांच्या कार्यपध्दतीत झालेले बदल, पालकांच्या, विद्यार्थ्यांच्या बदलत्या अपेक्षा व त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा बदललेला दृष्टीकोन इत्यादींचा शिक्षकांचा शिक्षकाच्या भूमिकेवर निश्चितच परिणाम झाला आहे. याबरोबरच शिक्षकांचा देखील आपल्या व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. परिणामी शिक्षकी व्यवसायाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. आज शिक्षकाच्या उत्तरदायित्वाची क्षेत्रे व्यापक होत चालली आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भावनिक विकासाबरोबरच त्यांच्यावर सुसंस्कार करण्याची जबाबदारी बऱ्याच प्रमाणात शिक्षकांवरच येऊन पडलेली आहे. आज शिक्षकांना व्यावसायिक

उत्तरदायित्व, आपल्या विद्यार्थ्यांप्रती उत्तरदायित्व, समाजाप्रती उत्तरदायित्व, राष्ट्राप्रती उत्तरदायित्व आणि नैतिक उत्तरदायित्व जबाबदारीने पार पाडण्यासाठी स्वत:मधील क्षमतांमध्ये अधिक उन्नती करावी लागणार आहे. तरच असे शिक्षक आपल्या कार्याला योग्य न्याय देऊ शकतील. प्रत्यक्षात मात्र शिक्षणक्षेत्रातील शिक्षकांच्या बदलत्या भूमिकेचा विचार करता आज शिक्षक वरील सर्व प्रकारची उत्तरदायित्व समर्थपणे पार पाडू शकतात का? असा प्रश्न मनात उपस्थित होतो म्हणून या प्रश्नाची चिकित्सा करण्यासाठीच प्रस्तुत शोध निबंधाची योजना करण्यात आली.

संशोधनाचे महत्त्व

शिक्षक मग तो कोणत्याही स्तरावर कार्य करणारा असो जितका गुणवतापूर्ण तसा त्याचा दर्जा, जितका तो कार्यक्षम, अंमलबजावणीबाबत जितके गांभीर्य, आपल्या भूमिका आणि कार्याबद्दलच्या कल्पना बाबतची सुस्पष्टता, जितकी व्यवसाय निष्ठा त्याप्रमाणात समाजाच्या जडणघडणीचे आणि राष्ट्रनिर्मितीचे कार्य तो अधिक परिपूर्णतेने करू शकेल. राष्ट्राचा दर्जा हा त्या राष्ट्रातील शिक्षकांच्या दर्जावर अवलंबून असतो. पर्यायाने शिक्षकाच्या दर्जाचा राष्ट्राच्या दर्जाशी घनिष्ठ संबंध आहे हे सुस्पष्टच आहे. म्हणजेच राष्ट्राचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. यासाठी आपले कार्य व्यक्तिगत जबाबदारीने पूर्ण करण्या बाबतची व्यापक प्रमाणातील उत्तरदायित्वाची भावना शिक्षकांमध्ये असणे आवश्यक आहे.

उत्तरदायित्व : संकल्पना

१- Accountability is an assurance that an individual or an organization will be evaluated on their performance of behavior related to something for which they are responsible.

(www.whatis. techtarget.com)

2. Accountability is a situation in which someone is responsible things that happen and can give a satisfactory reason for them. (Cambridge Business English Dictionary)

३. उत्तरदायित्तव म्हणजे विशिष्ट कार्यक्षेत्रात कार्य करणाऱ्या सदस्यांमध्ये निर्माण झालेल्या संवेदना आणि अभिव्यक्ती होय. उत्तरदायित्वाची भावना निर्माण झालेल्या सदस्यांमध्ये नैतिकता, सामाजिक बांधिलकी आणि सामिलकी म्हणजेच सहभागीत्व हे गुण अत्यंत उदात्त पातळीपर्यंत विकसित झालेले दिसतात.

शिक्षकाचे उत्तरदायित्व : संकल्पना

1. Accontability is more than a test score it is about monitoring and evaluating all processes required for every student to achieve at the highest level. In this time to increased accountability. Iot is also very important to remind ourseleves that as educators, our ultimate gole is to all our students to a place they did not think they could be. (www.learn.uvm .com)

2. Eductional accountability is a concept which assesses capacity of school system and especially of teachers who are held responsible for learning and academic progress of students in relation to the educational output, goals and values of the nation.

(The concise dictionary of education, Dictionary of Education – Ed.S.K.Singh, Encyclopedia Dictionary of Education – Ed.Mamta Mehendiratha)

शिक्षकाचे उत्तरदायित्व म्हणजे शिक्षण क्षेत्रात विविध स्तरांवर कार्य करणाऱ्या शिक्षकांमध्ये शिक्षकी व्यवसाय, विद्यार्थी, समाज आणि राष्ट्र यासंदर्भातील निर्माण झालेल्या अशा संवेदना आणि अभिव्यक्ती की ज्यायोगे शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा विकास उदात्त पातळीपर्यंत साधला जाऊन त्यांच्यामध्ये राष्ट्रीय अस्मिता जपण्याच्या भावना विकसित करण्यासाठी आणि राष्ट्राच्या जडणघडणीत रचनात्मक योगदान देण्याची वृत्ती विकसित होऊ शकेल यादृष्टीने शिक्षकांमध्ये निर्माण झालेली नैतिकता, सामाजिक बांधिलकी आणि सामीलकी म्हणजेच सहभागित्व हे गुण अत्यंत उदात्त पातळीपर्यंत विकसीत झालेले दिसतात.

शिक्षकाच्या उत्तरदायित्वाची क्षेत्रे

१. व्यावसायिक उत्तरदायित्त्व

शिक्षण हा व्यवसाय नसून ते एक सेवाव्रत आहे. त्यामुळे त्याचे पावित्र्य राखणे ही शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व मानवी घटकांची जबाबदारी आहे. किंबहुना शिक्षकांनी या जबाबदारीचे कर्तव्यपूर्वक पालन करावे अशी अपेक्षा आहे. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील अभिकर्ता म्हणून शिक्षकांकडे पाहिले जाते म्हणून शिक्षकांनी आपल्या व्यवसायाच्या आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असते. म्हणजेच आपल्या व्यवसायाच्या नीतीतत्त्वांचे व्यक्तिगत पातळीवर प्राधान्याने पालन करावे. तसेच आपल्या व्यावसायिक आणि संस्थात्मक उन्नतीसाठी त्याने सतत दक्ष असले पाहिजे. व्यक्तिगत आणि संस्थात्मक उन्नती ही विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण विकासासाठी आणि पर्यायाने सामाजिक व राष्ट्रीय विकासासाठी हातभार लावणारी असली पाहिजे.

२. विद्यार्थ्यांप्रती उत्तरदायित्त्व

विद्यार्थ्यांमुळेच आपल्या अस्तित्वाला अर्थ आहे ही बाब शिक्षकाने सतत लक्षात ठेवणे आवश्यक असते. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांच्या बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक आणि आंतरक्रियात्मक विकासासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे जबाबदार नागरिक घडविण्याची जबाबदारी आपलीच आहे या जाणीवेने शिक्षकांनी आपले कार्य केले पाहिजे. विद्यार्थी, पालक, समाज, राष्ट्र यांच्या अपेक्षा आणि आकांक्षांची पूर्तता करणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे या भावनेने प्रेरित होऊन कार्य केले पाहिजे.

३. समाजाप्रती उत्तरदायित्व

शिक्षण आणि समाजजीवन या समांतर चालणाऱ्या बाबी आहेत. कारण शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या, राष्ट्राच्या गरजांची पूर्तता होत असते. समाजातील बलस्थाने शोधून ती अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न शिक्षकांनी सातत्याने केला पाहिजे. तसेच समाजातील अंधश्रद्धा, गैरसमजूती, समाजप्रगतीत अडसर ठरणाऱ्या बाबीं दूर करण्यासाठी भावी नागरिक म्हणून विद्यार्थ्यांवर संस्कार करणे, त्यांच्यामध्ये डोळस दृष्टिकोन निर्माण करणे आवश्यक आहे. समाजात भ्रष्टाचार, नफेखोरी, मूल्यांचे अवमूल्यन, व्याभिचार, चंगळवाद, भौतिकतेबाबतची आगतिकता, पर्यावरण अवनती इत्यादी अनेक समस्या आहेत. या समस्यांच्या सोडवणूकीसाठी विधायक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांबरोबरच समाजाचेही उद्बोधन करावे आणि बलस्थानांना बळकटी आणण्यासाठी आणि समस्या दूर करण्यासाठी व्यापक स्वरूपात समाजाचा सहभाग घ्यावा हे कार्य करण्यासाठी शिक्षकांमध्ये समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना असणे आवश्यक आहे.

४. नैतिक उत्तरदायित्त्व

प्राचीन काळापासून भारतीय समाजात शिक्षकाचे स्थान सर्वात वरच्या स्तरावर राहिले आहे. याचे कारण म्हणजे शिक्षकांनी आपली नैतिकता टिकविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. आधुनिक काळात मात्र शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या अशोभनीय घटनांमुळे शिक्षकाची आणि शिक्षणक्षेत्राची प्रतिमा काही प्रमाणात मलिन झाली आहे. म्हणून ही प्रतिमा पूर्णत: उज्ज्वल बनविण्यासाठी सर्वांनी मिळून सामाजिक स्वरूपात प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्या व्यावसायिक आचारसंहितेचे भान प्रत्येक शिक्षकाला असणे आवश्यक आहे. समाजाला सदाचाराची, नैतिकतेची शिकवण शिक्षक आपल्या आचरणातून देत असतात. न्यायाचे, कायद्याच्या अनुपालनाचे संस्कारसंचित शिक्षकच आपल्या विद्यार्थ्यांना पर्यायाने समाजाला देत असतो समाजाने स्वीकारलेल्या नीतीतत्त्वांवरून राष्ट्राच्या स्वत्वाचा, अस्मितेचा परिचय होत असतो. म्हणून शिक्षकाने शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक पुनर्रचनेचे कार्य करावे आणि नव्या संदर्भानी समाजाची, राष्ट्राची ओळख निर्माण करण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून शिक्षकाचे कार्य करावे .

प्रस्तुत संशोधनातून शिक्षकांच्या आपल्या व्यवसायाप्रती, विद्यार्थ्यांप्रती, समाजाप्रती आणि नैतिकते विषयीच्या उत्तरदायित्वाचा शोध घेऊन शिक्षकाच्या कार्याच्या वरील क्षेत्राशी संबंधीत जमेच्या बाजूंचा व कच्च्या दुव्यांचा शोध घेतला गेला व त्याद्वारे शिक्षकांनी उत्तरदायित्त्वाच्या अधिक प्रभावी भावनेने प्रेरित होऊन कार्य करावे यासाठी शिफारशी सूचविण्यात आल्या ज्यांचा उपयोग शिक्षणाच्या सर्वच स्तरावर कार्य करणाऱ्या शिक्षकांना मार्गदर्शक ठरू शकेल असे वाटते.

संशोधनाची उद्दिष्टे

१. औरंगाबाद शहरातील कार्यरत शिक्षकांच्या कार्यासंदर्भात विद्यार्थ्यांची मते जाणुन घेणे.
२. शिक्षकांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.
३. शिक्षकांच्या विद्यार्थ्यांप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा शोध घेणे.
४. शिक्षकांच्या आचरणासंबंधी विद्यार्थ्यांची मते आजमाविणे.
५. शिक्षकांच्या उत्तरदायित्वासंबंधी उपाययोजना सूचविणे.

संशोधनाची गृहीतके

१. विद्यार्थ्यांच्या समतोल व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षणाला दर्जेदार संस्कार प्रक्रियेचे अधिष्ठान असणे आवश्यक असते.
२. या संस्कारप्रक्रियेत शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.
३. शिक्षक उत्तरदायित्वाच्या भावनेने कार्य करणारा असेल तर संस्काराचे कार्य अधिक प्रभावीपणे होते.

संशोधनाच्या परिकल्पना

१. आपल्या व्यवसायाप्रती उत्तरदायित्वाची भावना असलेले शिक्षक आपले कार्य निष्ठेने करतात.
२. शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांप्रती तळमळ असेल तर ते विद्यार्थ्यांच्या समतोल विकासासाठी प्रयत्नशील असतात.
३. शिक्षकाच्या सामाजिक कार्यामधून त्यांची सामाजिक उत्तरदायित्वाची भावना प्रकट होते.
४. विद्यार्थ्यांवर करीत असलेल्या सुसंस्कांमधून शिक्षकांचा नैतिक दृष्टिकोन अभिव्यक्त होत असतो.

संशोधनातील तांत्रिक संकल्पनांच्या कार्यात्मक व्याख्या

१. **शिक्षक** : शालेय स्तरावरील पाचवी ते सहावी इयत्तांना अध्यापन करणारे शिक्षक.
२. **शिक्षकाचे उत्तरदायित्व** : आपले दैनंदिन शैक्षणिक कार्य, अभ्यासपूरक व अभ्यासेंतर उपक्रम, सामाजिक उपक्रमांची अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांच्या चारित्र्य संवर्धन विषयक कार्य करतांना शिक्षकाधील प्रकट होणारी व्यावसायिक वृत्ती.
३. **व्यावसायिक उत्तरदायित्व** : शिक्षकाचा आपल्या शिक्षकी व्यवसायाप्रती असणारा सकारात्मक आणि गुणवत्तायुक्त दृष्टिकोन.
४. **विद्यार्थ्यांप्रती उत्तरदायित्व** : आपल्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अभ्यासक्रम, वेळापत्रकाच्या चौकटी बाहेर जाऊन कार्य करण्याची शिक्षकाची वृत्ती.
५. **समाजाप्रती उत्तरदायित्व** : शिक्षणाव्दारे विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी आपल्या शैक्षणिक कार्याला सामाजिक उपक्रमांचे, अधिष्ठान प्राप्त करून देण्याची शिक्षकांचा दृष्टिकोन
६. **नैतिक उत्तरदायित्व** : आपल्या व्यवसायाच्या आचारसंहितेचे पालन करून आपल्या प्रत्येक कृती आणि उक्तीला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याची शिक्षकाची वृष्टी.

संशोधनाची व्याप्ती

१. **क्षेत्रव्याप्ती**

अ. अभ्यासक्षेत्र – प्रस्तुत संशोधन हे मूल्यमापन या अभ्यासक्षेत्राशी संबंधीत आहे.

ब. भौगोलिक क्षेत्र – प्रस्तुत संशोधन औरंगाबाद शहर या भौगोलिक क्षेत्राशी संबंधीत आहे.

२. **आशयव्याप्ती** – प्रस्तुत संशोधन हे शिक्षकाचे मूल्यमापन या आशयाशी संबंधित आहे.
३. **नमुनाव्याप्ती** – प्रस्तुत संशोधन हे इयत्ता पाचवी ते दहावी स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

संशोधनाच्या मर्यादा

१. **क्षेत्र मर्यादा**

अ. अभासक्षेत्र – प्रस्तुत संशोधन शिक्षकाचे मूल्यमापन या अभ्यासक्षेत्रापुरते मर्यादित आहे.

ब. भौगोलिक क्षेत्र –प्रस्तुत संशोधन औरंगाबाद शहरातील सिडको परिसरापुरते मर्यादित आहे.

२. **आशयव्याप्ती** – प्रस्तुत संशोधन हे शिक्षकाच्या उत्तरदायित्वाचे मूल्यमापन या आशयापुरते मर्यादित आहे.

३. **नमुनाव्याप्ती** – प्रस्तुत संशोधन हे इयत्ता पाचवी ते दहावी या इयत्तांना अध्ययन करणाऱ्या एकूण पन्नास विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

४. **कार्यपध्दतीची मर्यादा** –

१. शिक्षकाच्या उत्तरदायित्वाच्या मुल्यमानपनाचे अनेक मार्ग आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी विद्यार्थीव्दारा शिक्षकाच्या उत्तरदायित्वाचे मुल्यमापन या मार्गाचा अवलंब करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत संशोधन सर्वेक्षण पद्धतीने करण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षकाच्या मूल्यमापनासाठी विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीद्वारे दिलेल्या प्रतिसादावरून निष्कर्ष काढण्यात आले व शिफारशी करण्यात आल्या आहेत. संशोधनाच्या अन्य पद्धतीद्वारे देखील हे संशोधन करणे शक्य आहे ही संशोधन पद्धतीच्या वापराची मर्यादा आहे.

संशोधनाची पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

माहिती संकलनाचे साधन

प्रस्तुत संशोधन माहिती संकलनासाठी मतावली या साधनाचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनातील जनसंख्या

प्रस्तुत संशोधनात औरंगाबाद शहरातील इयत्ता पाचवी ते दहावीचे विद्यार्थी ही जनसंख्या आहे.

संशोधनातील नमुना

प्रस्तुत संशोधनासाठी औरंगाबाद शहरातील सिडको परिसरातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या एकूण ५० (पन्नास) विद्यार्थ्यांचा नमुन्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

सांख्यिकी तंत्राचा वापर

संशोधन विषयाशी संबंधित मतावली द्वारे प्राप्त माहितीच्या विश्लेषणासाठी शेकडोवारीच्या आधारे विश्लेषण करण्यात आले आहे.

संशोधनाची कार्यपद्धती

प्रस्तुत संशोधनाअंतर्गत विषय निश्चितीनंतर संशोधन विषयाच्या सैद्धांतिक अधिष्ठानाचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार जनसंख्येमधून नमुना निवडीचे स्वरूप निश्चित करण्यात आले. मतावली या साधनाची निर्मिती करण्यात आली. नमुन्यातील १% प्रतिसादकांना मतावली हे साधन देवून माहिती संकलन करण्यात आले. प्राप्त प्रतिसादांवरून साधनामधील काही प्रश्नांमध्ये सुधारणा करून सुधारीत साधनाव्दारे नमुना गटातील विद्यार्थ्यांकडून माहिती संकलित करण्यात आली. प्राप्त माहितीचे शेकडोवारीच्या आधारे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून त्याआधारे निष्कर्ष काढण्यात आले प्राप्त निष्कर्षांच्या आधारे शिफारशी सुचविण्यात आल्या.

निष्कर्ष

१. १००% प्रतिसादकांच्या मते शिक्षक दर्जेदार अध्यापनकार्य करण्यासाठी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांना वैविध्यपूर्ण अध्ययन अनुभव देतात आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

२. शिक्षक विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगाची आव्हाने पेलण्यासाठी समर्थ बनविण्याचा प्रयत्न करतात. मात्र हे कार्य अधिक प्रभाविपणे करावे अशी अपेक्षा ५०% प्रतिसादक बाळगतात

३. शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या अंतकरणातील स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे असे ९०% प्रतिसादक विद्यार्थी प्रतिपादन करतात त्यामुळेच आमचे वर्गखोली बाहेरचे, शाळेबाहेरचे जग फुलविण्यासाठी शिक्षकांव्दारे होत असलेल्या प्रयत्नांपेक्षा अधिक प्रयत्न व्हावेत असेही विद्यार्थी नमूद करतात.

४. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांप्रमाणे पालकत्व स्वीकारणे आणि प्रेम, सुसंस्कार, भावनिक गरजा, जीवनविषयक मार्गदर्शन, प्रेरणा इत्यादी गरजा कुटूंबाप्रमाणेच शिक्षकांनी देखील पूर्ण कराव्यात असे १००% प्रतिसादक विद्यार्थी प्रतिपादन करतात.

५. शिक्षकांनी महान अशा सामाजिक कार्यांमध्ये सहभाग घ्यावा आणि त्यामध्ये विद्यार्थ्यांनाही त्यांच्या बरोबरीने सहभागी करून घ्यावे असे ७५% प्रतिसादक विद्यार्थ्यांचे मत आहे.

६. शिक्षक हाच एक असा घटक आहे जो समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा यांचे निर्मूलन करून त्याऐवजी आदर्श मूल्यांच्या संस्कार समाजावर करू शकतात असा आशावाद १००% प्रतिसादक विद्यार्थी व्यक्त करतात.

७. समाजातील सर्व प्रकारचे मतभेद मिटवून टाकण्यासाठी स्वत: पुढाकार घेऊन कार्य करावे असे ८२% प्रतिसादक विद्यार्थ्यांचे मत आहे.

८. विविध शाळांमधील शिक्षकांनी एकत्र येऊन आपल्या देशाला बलवान करण्याचे कार्य करावे असे मत ९५% प्रतिसादक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे.

९. शिक्षकांनी आपल्या देशासमोरील विविध आव्हानांना समर्थपणे पेलण्याची क्षमता असलेले विद्यार्थी आजपर्यंत घडविले आहेतच. यापुढेही त्यांनी हे कार्य अधिक प्रभावीपणे करावे असे मत ९२% प्रतिसादक विद्यार्थी प्रतिपादन करतात.

१०. विद्यार्थी आपल्या शिक्षकांकडून दर्जेदार वर्गअध्यापनाबरोबरच सामाजिक, राष्ट्रीय जबाबदाऱ्या स्वीकारणारे, राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान देणारे आणि नैतिकदृष्ट्या अत्यंत सक्षम असे शिक्षक असावेत अशी अपेक्षा बाळगतात.

शिफारशी –

अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ

१. प्रचलित शालेय स्तरावरील अभ्यासक्रमात विविध अभ्यासपूरक आणि अभ्यासेत्तर उपक्रम समाविष्ट करण्यात आलेले आहेत. मात्र येणाऱ्या युगाची मागणी लक्षात घेता हे उपक्रम पुरेसे नाहीत म्हणून विद्यार्थ्यामध्ये समाजाभिमुख दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी आवश्यक आशय, उपक्रम विविध विषयांच्या पाठ्यक्रमामध्ये, अभ्यासपुरक आणि अभ्यासेत्तर उपक्रमांमध्ये समाविष्ट करण्यात यावेत जेणेकरून असे उपक्रम राबविण्याची शिक्षकांना संधी मिळेल.

२. अभ्यासक्रमात उपक्रम सुचवितांना या उपक्रमांमधून अपेक्षित फलश्रुती कोणकोणती असावी याबाबतच्या मार्गदर्शक सूचना असतील तर शिक्षक त्यांच्या संपादनासाठी प्रयत्न करतील त्याचबरोबर अभ्यासक्रमातील सूचित केलेल्या फलश्रुती पेक्षाही अधिक संपादनाच्या दृष्टीने प्रयत्न करतील आणि ते रचनात्मक कार्याच्या दृष्टीने अधिक फलदायी ठरेल.

३. शिक्षकाच्या मूल्यमापनाची योजना करण्यात आलेली आहे. त्यामध्ये शिक्षकाच्या विद्यार्थ्यांप्रती, आपल्या व्यवसायाप्रती, समाजाप्रती, राष्ट्राप्रती आणि शिक्षकाचे नैतिक उत्तरदायित्वाच्या मूल्यमापनाची तरतूद करावी म्हणजे शिक्षक उत्तरदायित्वाच्या भावनेने अधिक दक्ष राहून कार्य करू शकतील.

शिक्षण विभाग :

१. अभ्यासक्रमातील विविध उपक्रमांच्या अंमलबजावीसाठी उपक्रमशील शिक्षकांनी पुरेसे स्वातंत्र्य द्यावे. विद्यार्थ्यांची केवळ परीक्षेची तयारी, परीक्षेतील संपादणूक यादृष्टीने अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीवर भर दिला जावू नये.

२. शिक्षकांना विविध सामाजिक, राष्ट्रीय आणि वैश्विक मूल्यांचे उपयुक्तता मूल्यांचे अधिष्ठान असलेले उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अशा उपक्रमशील शिक्षकांसाठी प्रोत्साहनपर योजना राबविल्या जाव्यात जेणे करून असे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये सृजनात्मक, रचनात्मक,पुनर्रचनात्मक दृष्टिकोन विकसीत करू शकतील.

मुख्याध्यापकांसाठी शिफारशी

१. मुख्याध्यापकांनी शिक्षकांच्या अध्यापनाने नियमित अवलोकन करावे आणि शिक्षक अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करीत असलेल्या क्षमता, विधायक, रचनात्मक दृष्टिकोन, पुस्तकी ज्ञानाला व्यवहारिक उपयोजनाचे दिले जाणारे अधिष्ठान सामाजिक, राष्ट्रीय, वैश्विक समस्यांसंदर्भातील जागरूकता किती प्रमाणात निर्माण करतात यादृष्टीने मूल्यमापनावर भर दिला जावा जेणेकरून शिक्षकांना अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये रचनात्मक, विधायक दृष्टिकोन विकसित करण्याची प्रत्यक्ष स्वरूपात प्रेरणा मिळेल.

२. मुख्याध्यापकांनी आपल्या अधिपत्याखालील शिक्षकांना समाजाभिमुख, रचनात्मक, विधायक उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहित करावे. त्याच्या अशा कार्याची विशेष नोंद घेऊन वरिष्ठ स्तरापर्यंत या कार्यांची नोंद होईल यादृष्टीने प्रयत्न करावेत म्हणजेच शिक्षक उत्तरदायित्वाच्या भावनेने प्रेरित होउन कार्य करू शकतील.

शिक्षकांसाठी शिफारशी

१.शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयांबद्यल अभिरूची निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असतातच त्याचबरोबर त्यांच्यामध्ये विविध प्रकारच्या वैचारिक क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न करावा. उदा. तुलना, तर्क–अनुमान, निष्कर्ष काढण्याची क्षमता, कल्पनाशक्तीचा विकास अमूर्त चिंतनाची क्षमता इत्यादी वैचारिक क्षमतांचा विकास करून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या परिसरातील स्थानिक समस्या, सामाजिक आणि राष्ट्रीय समस्यांप्रती जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

२. शिक्षक आपल्या शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून एक जबाबदार नागरिक निर्मितीचे कार्य करतात यात शंका नाही. आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. या युगाची आव्हाने वेगळी आहेत तंत्रज्ञानाधिष्ठित जीवनशैली, सोशल नेटवर्कींग साईटसचा अतिवापर आणि त्यामुळे बऱ्याच प्रमाणात भावी पिढयांचे होत असलेले नैतिक अध:पतन, मूल्याधिष्ठित समाजाचे अपवादाने किंवा अत्यल्प स्वरूपात पहावयास मिळणारे चित्र, वाढता भ्रष्टाचार, दहशतवादी कारवाया यांचे वाढते प्रमाण, पर्यावरण अवनती, जागतिक तापमानवृध्दी या आणि यासारख्या समस्यांच्या उकलीसाठी आपल्या विद्यार्थ्यांध्ये विधायक रचनात्मक दृष्टिकोन विकसित करण्यावर विशेष भर दिला जावा त्यासाठी या समस्यांवर आधारीत विविध प्रकल्प विद्यार्थ्यांच्या सहाय्याने हाती घ्यावेत.

समारोप

राष्ट्रउभारणीच्या कार्यात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे यात शंकाच नाही. शिक्षकांनी आपल्या शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून रचनात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी अविरत प्रयत्न करावेत यासाठी शिक्षकांना पुरेसे स्वातंत्र्य आणि प्रोत्साहन मिळावे. शिक्षणक्षेत्रातील अशा उपक्रमशिल आणि उत्तरदायी शिक्षकांचे संघटन झाल्यास आणि त्यांच्या कार्याला व्यापक स्वरूपात प्रसिध्दी मिळाल्यास निश्चितच राष्ट्रउभारणीचे कार्य अधिक प्रभावीपणे होवु शकेल यात कोणाचीही दुमत असणार नाही.

संदर्भग्रंथ सूची –

१. पाटील, लिला, (१९७४), आजचे शिक्षण आजच्या समस्या, पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
२. भिलेगावकर, स्मिता, (२००६), माध्यमिक शिक्षणाची कार्यपध्दती, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

३. भोसले रमा, येवले सिमा (२०१०), ज्ञानधिष्ठित समाज, कोल्हापूर : प्रकाशन.
४. महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (२००९), अध्यापक पुस्तिका–१, पुणे : महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
५. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (२००५), राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, नवी दिल्ली : राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

2. Dictionary of Education
1. S.K.Singh – The consise dictionary of Education.
2. Mehendiratha mamta – Encyclopedia Dictionary of Education

3. Webbigraphy
1. www.whatis.techtarget.com.
2. www.learn.uvm.com.